# उमेदवारांना सूचना

**दिनांक : २८.०३.२०१८**

## लघुलेखक (नि.श्रे.) (Stenographer (L.G.))

१. जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील 'लघुलेखक (नि.श्रे.)' या पदासाठी उमेदवारांची निवडसूची / प्रतिक्षा यादी तयार करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून, जे दि. २८.०३.२०१८ रोजी पात्रतेचे निकष पूर्ण करतात, त्यांच्याकडून 'ऑन लाईन' (On-line) अर्ज मागविण्यात येत आहेत. उच्च न्यायालयाच्या अधिसूचना क्र. नियम/एक्स्–२३१९/७१, दि. २० नोव्हेंबर, २००९ अनुसार १% पदे शारीरिकदृष्ट्या अपंगांसाठी म्हणजेच ज्यांचा एक पाय अधू आहे (one leg is affected) अशांसाठी १% पदे आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

२. **पात्रतेचे निकष** :– लघुलेखक (नि.श्रे.)

अर्हता :– पात्र होण्यासाठी उमेदवार –

(अ) कमीत कमी एस्.एस्.सी. (S.S.C.) बोर्ड परीक्षा उत्तीर्ण असावा, परंतु कोणत्याही मान्यतापात्र विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेच्या पदवीधारकास आणि कायद्याच्या पदवीधारकास प्राधान्य दिले जाईल.

(ब) शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र परीक्षा, किंवा शासकीय मंडळ अथवा आय्.टी.आय्. (I.T.I.) द्वारे घेतली जाणारी १०० श.प्र.मि. वेगाची लघुलेखन आणि कमीत कमी ४० श.प्र.मि. वेगाची इंग्रजी टंकलेखन आणि ३० श.प्र.मि. वेगाची मराठी टंकलेखन व ८० श.प्र.मि. वेगाची मराठी लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण असावा.

(क) संगणकाचे ज्ञान असल्याबाबतचे खालील संस्थांकडील प्रमाणपत्रधारक असावा.

अ) डी.ओ.ई.ए.सी.सी./एन्.आय्.ई.एल्.आय.टी. (D.O.E.A.C.C./N.I.E.L.I.T.)
ब) विद्यापीठ
क) सी–डॅक (C-DAC)
ड) एम्.एस्.–सी.आय्.टी. (MS-CIT)
इ) व्यावसायिक शिक्षणक्रम – राज्य सरकार
फ) व्यावसायिक शिक्षणक्रम – केंद्र सरकार
ग) आय्.टी.आय्. – केंद्र सरकार
ह) आय्.टी.आय्. – राज्य सरकार
य) तांत्रिक मंडळ

(ड) दिनांक २८/०३/२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकूण ०२ पेक्षा जास्त असू नये.

.. २/–

# <u>कनिष्ठ लिपिक (Junior Clerk)</u>

**३.** जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील 'कनिष्ठ लिपिक' या पदासाठी उमेदवारांची निवडसूची / प्रतिक्षा यादी तयार करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून, जे दि. २८.०३.२०१८ रोजी पात्रतेचे निकष पूर्ण करतात, त्यांच्याकडून 'ऑन लाईन' (On-line) अर्ज मागविण्यात येत आहेत. उच्च न्यायालयाच्या अधिसूचना क्र. नियम/एक्स्–२३१९/७१, दि. २० नोव्हेंबर, २००९ अनुसार २% पदे शारीरिकदृष्ट्या अपंगांसाठी, म्हणजेच, ज्यांची श्रवणशक्ती अधू आहे अशांसाठी १% पदे व ज्यांचा एक पाय अधू आहे अशांसाठी १% पदे आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

**४. <u>पात्रतेचे निकष</u>** :– कनिष्ठ लिपिक

<u>अर्हता</u> :– पात्र होण्यासाठी उमेदवार –

(अ) कमीत कमी एस्.एस्.सी. (S.S.C.) बोर्ड परीक्षा उत्तीर्ण असावा. परंतु, कोणत्याही मान्यतापात्र विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेच्या पदवीधारकास आणि कायद्याच्या पदवीधारकास प्राधान्य दिले जाईल.

(ब) शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र परीक्षा, किंवा शासकीय मंडळ अथवा आय्.टी.आय्. (I.T.I.) द्वारे घेतली जाणारी ४० श.प्र.मि. वेगाची इंग्रजी टंकलेखन आणि ३० श.प्र.मि. वेगाची मराठी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असावा.

(क) संगणकाचे ज्ञान असल्याबाबतचे खालील संस्थांकडील प्रमाणपत्रधारक असावा.

अ) डी.ओ.ई.ए.सी.सी./एन्.आय्.ई.एल्.आय.टी. (D.O.E.A.C.C./N.I.E.L.I.T.)
ब) विद्यापीठ
क) सी–डॅक (C-DAC)
ड) एम्.एस्.–सी.आय्.टी. (MS-CIT)
इ) व्यावसायिक शिक्षणक्रम – राज्य सरकार
फ) व्यावसायिक शिक्षणक्रम – केंद्र सरकार
ग) आय्.टी.आय्. – केंद्र सरकार
ह) आय्.टी.आय्. – राज्य सरकार
य) तांत्रिक मंडळ

(ड) दिनांक २८/०३/२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकूण ०२ पेक्षा जास्त असू नये.

## शिपाई / हमाल (Peon/Hamal)

५. जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील ‘शिपाई/हमाल’ या पदासाठी उमेदवारांची निवडसूची / प्रतिक्षा यादी तयार करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून, जे दि. २८.०३.२०१८ रोजी पात्रतेचे निकष पूर्ण करतात, त्यांच्याकडून ‘ऑन लाईन’ (On-line) अर्ज मागविण्यात येत आहेत. उच्च न्यायालयाच्या अधिसूचना क्र. नियम/एक्स्–२३१९/७१, दि. २० नोव्हेंबर, २००९ अनुसार २% पदे शारीरिकदृष्ट्या अपंगांसाठी, म्हणजेच, ज्यांची श्रवणशक्ती अधू आहे अशांसाठी १% पदे व ज्यांचा एक पाय/एक हात अधू आहे अशांसाठी १% पदे आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

६. **पात्रतेचे निकष** :– शिपाई / हमाल

अर्हता :–

(अ) कमीत कमी इ. ७वी उत्तीर्ण असावा आणि शरीरयष्टी चांगली असावी.

(ब) दिनांक २८/०३/२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकूण ०२ पेक्षा जास्त नसावी.

====================

७. **सर्व पदांकरिता वयोमर्यादा**

(अ) उमेदवार, सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १८ वर्षापेक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे २८.०३.२०१८ रोजी त्यावेळेपुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या विशेष मागासप्रवर्गाकरिता ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा.

(ब) शासन निर्णय क्र. एस्.आर.व्ही.–१०७७/३५७६/१४३३/१६–अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्ये पार पाडण्याकरिता सक्षम असतील तर, त्यांच्याबाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल केलेली आहे.

## ८. सेवाप्रवेश क्रमसूची

| अ.नं. | दिनांक | प्रक्रिया |
|---|---|---|
| १ | **२७.०३.२०१८** | संबंधित जिल्ह्याकडून जाहिरातीची स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्धी. |
| २ | **२८.०३.२०१८** | उच्च न्यायालयाच्या संकेत स्थळावर (Web-site) विस्तृत जाहिरात प्रसिद्ध. अर्ज सकाळी ८.०० वाजल्यापासून ऑन–लाईन स्वीकारले जातील. |
| ३ | **१०.०४.२०१८** | विस्तृत जाहिरातीची लिंक संध्याकाळी ५.३० वाजता खंडित करण्यात येईल. |
| ४ | **१६.०४.२०१८** | छाननी करून सूचीबद्ध केलेल्या पात्र उमेदवारांची सूची संकेत स्थळावर प्रसिद्ध. |
| ५ | **२१.०४.२०१८ ते २७.०४.२०१८ (न्यायालयीन सुट्ट्या वगळून)** | छाननी होवून सूचीबद्ध झालेल्या उमेदवारांनी प्रपत्राची प्रत (Printout of Form) संबंधित जिल्हा न्यायालयाकडे म्हणजे ज्या न्यायालयातून ते छाननी होवून सूचीबद्ध झालेले आहेत त्या न्यायालयाकडे सोपवावी आणि आपले प्रवेश पत्र प्राप्त करून घ्यावे. |
| ६ | **०६.०५.२०१८** | छाननी करून सूचीबद्ध केलेल्या उमेदवारांची कनिष्ठ लिपिक आणि शिपाई/हमाल पदांसाठी चाळणी परीक्षा (Screening Test) |
| ७ | **१०.०५.२०१८** | चाळणी परीक्षेचा निकाल. |
| ८ | **०९.०६.२०१८** | कनिष्ठ लिपिक पदासाठी स्थानिक भाषेतील टंकलेखन परीक्षा. |
| ९ | **१४.०६.२०१८** | स्थानिक भाषेतील टंकलेखन परीक्षेचा निकाल. |
| १० | **१२.०५.२०१८ आणि १३.०५.२०१८** | शिपाई/हमाल पदांसाठी उमेदवारांची क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी (Activeness & Cleanliness Test). |
| ११ | **१६.०५.२०१८** | क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी निकाल. |
| १२ | **१७.०६.२०१८** | कनिष्ठ लिपिक पदासाठी इंग्रजी टंकलेखन परीक्षा. |
| १३ | **२१.०६.२०१८** | इंग्रजी टंकलेखन परीक्षेचा निकाल. |
| १४ | **१०.०६.२०१८** | छाननी होवून सूचीबद्ध केलेल्या उमेदवारांची इंग्रजी भाषेतील श्रुतलेखन परीक्षा, लघुलेखक (नि.श्रे.) पदासाठी. |
| १५ | **२३.०६.२०१८** | छाननी होवून सूचीबद्ध केलेल्या उमेदवारांची लघुलेखक (नि.श्रे.) पदासाठी स्थानिक भाषेतील श्रुतलेखन परीक्षा |
| १६ | **२७.०६.२०१८** | इंग्रजी आणि स्थानिक भाषेतील श्रुतलेखन परीक्षानिकाल. |
| १७ | **०१.०७.२०१८** | लघुलेखक (नि.श्रे.) पदासाठी स्थानिक भाषेतील टंकलेखन परीक्षा. त्याच दिवशी निकालानंतर इंग्रजी टंकलेखन परीक्षा. |
| १८ | **०३.०७.२०१८** | इंग्रजी टंकलेखन परीक्षेचा निकाल. |
| १९ | **०९.०७.२०१८ ते १३.०७.२०१८** | लघुलेखक (नि.श्रे.) पदासाठी मुलाखत. |
| २० | **मुलाखतीच्या अंतिम दिनांकापासून एका आठवड्याच्या आत. (२०.०७.२०१८)** | लघुलेखकांची (नि.श्रे.) अंतिम यादी तयार केली जाईल व उच्च न्यायालयास मान्यतेसाठी सादर केली जाईल. |
| २१ | **१६.०७.२०१८ ते ३०.०७.२०१८** | कनिष्ठ लिपिक आणि शिपाई /हमाल पदांसाठी मुलाखत |
| २२ | **मुलाखतीच्या अंतिम दिनांकापासून एका आठवड्याच्या आत. (०७.०८.२०१८)** | कनिष्ठ लिपिक आणि शिपाई /हमाल या पदांसाठी अंतिम यादी तयार केली जाईल आणि ती उच्च न्यायालयास मान्यतेसाठी सादर केली जाईल. |

**टिप :** उपरोक्त क्रमसूचीनुसार (वेळापत्रकानुसार) जर कोणत्याही दिवशी वर ठरल्यानुसार कार्यक्रम (चाचणी/मुलाखत) घेता आली नाही तर तो कार्यक्रम पुढील दिवशी घेण्यात येईल आणि क्रमसूचीचे समायोजन त्याप्रमाणे उच्च न्यायालयाच्या मान्यता सापेक्ष करण्यात येईल.

**टिप :** आवश्यक असल्यास, यातील तारखा, उच्च न्यायालयाच्या मान्यता सापेक्ष त्यात बदल/फेरबदल होण्यास अधीन असतील.

| दुय्यम न्यायालयांतील रिक्त पदांचा तपशील दर्शविणारा तक्ता | | | |
|---|---|---|---|
| **पदे** | **लघुलेखक (नि.श्रे.)** | **कनिष्ठ लिपिक** | **शिपाई / हमाल** |
| **शैक्षणिक पात्रता** | एस्.एस्.सी. | एस्.एस्.सी. | ७वी |
| **वय** | कमीत कमी १८ वर्षे, जास्तीत जास्त ३८ वर्षे (राखीव प्रवर्ग–४३ वर्षे आणि शारीरिकदृष्ट्या अपंग– ४५ वर्षे) सर्व पदांसाठी | | |
| **संगणकाचे ज्ञान** *** | आवश्यक | आवश्यक | – |
| **टंकलेखक** ** | इंग्रजी–४० श.प्र.मि. | इंग्रजी–४० श.प्र.मि. | – |
| | मराठी–३० श.प्र.मि.* | मराठी–३० श.प्र.मि.* | – |
| **लघुलेखन** ** | इंग्रजी–१०० श.प्र.मि. | | – |
| | मराठी–८० श.प्र.मि.* | | – |

* दिव, दमण, दादरा आणि नगर हवेली, सिल्वासा यांशिवाय

** शासनाची वाणिज्यिक प्रमाणपत्र परीक्षा किंवा शासनमंडळ संचलित परीक्षा किंवा आय्.टी.आय्. यांद्वारे मान्यताप्राप्त.

*** डी.ओ.ई.ए.सी.सी. (D.O.E.A.C.C.)/एन्.आय्.ई.एल्.आय.टी. (N.I.E.L.I.T.)/विद्यापीठ /सी–डॅक (C-DAC)/एम्.एस्.–सी.आय्.टी. (MS-CIT) यापैकी कोणतेही.

| रिक्त पदे.... | **लघुलेखक (नि.श्रे.)** | **कनिष्ठ लिपिक** | **शिपाई / हमाल** |
|---|---|---|---|
| **वेतनश्रेणी** | **(रु.९३००–३४८०० + ४३०० ग्रे.पे.)** | **(रु. ५२००–२०२०० + १९०० ग्रे.पे.)** | **(रु. ४४४०–७४४० + १३०० ग्रे.पे.)** |
| **आस्थापना** | | | |
| **मुंबई नगर दिवाणी न्यायालय** | **२** | **१५०** | **१५८** |
| **सी.एम्.एम्., मुंबई (CMM)** | **१२** | **१५०** | **८४** |
| **लघुवाद न्यायालय, मुंबई** | **१२** | **१४४** | **९०** |
| **जिल्हा न्यायालये** | | | |
| **अहमदनगर** | **५८** | **२८८** | **१४४** |
| **अकोला** | **३६** | **७४** | **७२** |
| **अमरावती** | **३०** | **१२०** | **९६** |
| **औरंगाबाद** | **८८** | **२२४** | **१४६** |
| **बीड** | **१५** | **९५** | **७७** |
| **भंडारा** | **२६** | **१३०** | **६२** |
| **बुलढाणा** | **१७** | **४६** | **७५** |
| **चंद्रपुर** | **४५** | **१०७** | **८८** |
| **धुळे** | **१३** | **५२** | **४३** |

| | | | |
|---|---|---|---|
| गडचिरोली | १० | ५४ | ३२ |
| गोंदिया | १८ | ८२ | ४० |
| जळगांव | १० | २१० | १२० |
| जालना | ३० | १०४ | ५० |
| कोल्हापूर | ३६ | ११० | ११२ |
| लातूर | २८ | १०४ | १०६ |
| नागपूर | २४ | १७२ | १६० |
| नांदेड | २६ | १४४ | ११४ |
| नंदूरबार | ६ | ५० | २० |
| नाशिक | २२ | १३० | ८४ |
| उस्मानाबाद | २० | १०० | ६० |
| परभणी | १४ | १०० | ८६ |
| पुणे | ११५ | ३७८ | १५० |
| रायगड–अलिबाग | २० | १३६ | ७८ |
| रत्नागिरी | २० | १३० | ७० |
| सांगली | ३२ | १२८ | १०८ |
| सातारा | ३२ | १७८ | ९० |
| सिंधुदुर्ग | १२ | ४० | २० |
| सोलापूर | ५० | १२८ | ९२ |
| ठाणे | ४६ | २५४ | १४७ |
| वर्धा | ४२ | १७६ | ९० |
| वाशिम | ३० | ६६ | ५२ |
| यवतमाळ | १२ | १७० | १४६ |
| दिव | ० | ० | ४ |
| दमण | २ | ६ | ४ |
| सिल्वासा | २ | ८ | ० |
| एकूण | १०१३ | ४७३८ | ३१७० |

लघुलेखक (नि.श्रे.) १०१३, कनिष्ठ लिपिक ४७३८, शिपाई/हमाल ३१७० = एकूण ८९२१

९. चुका टाळण्यासाठी, प्रत्यक्ष अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी संकेतस्थळावर दाखविण्यात येणाऱ्या सूचना लक्षपूर्वक वाचाव्यात.

१०. अर्ज दि. १०.०४.२०१८ पर्यंत केवळ 'ऑनलाईन' (on-line) सादर करण्यात यावेत. टपालाने /हस्त बटवड्याने अथवा कुरिअरने पाठविलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी कोणतेही प्रमाणलेख, कागदपत्रे, प्रमाणपत्रे भरती अधिकाऱ्यांकडे पाठवू नयेत, तसेच जोपर्यंत मागणी करण्यात येत नाही, तोपर्यंत त्यांनी अशी कागदपत्रे न्यायालय अधिकाऱ्यांच्या हवाली करू नये.

११. 'ऑन–लाईन' अर्ज भरण्यास सुरुवात करण्यापूर्वी, उमेदवाराकडे त्याचे/तिचे 'पासपोर्ट' आकाराचे नविनतम छायाचित्र आणि सही .jpg / .jpeg स्वरुपामध्ये (format) वेगवेगळ्या 'फाईल्स'मध्ये अशा रितीने स्कॅन (scanned) केलेले असावे की, प्रत्येक फाईलचे आकारमान ४०KB पेक्षा जास्त नसावे आणि उमेदवाराने ते ऑन–लाईन अर्जामध्ये दर्शविलेल्या योग्य जागी संलग्न करावे.

१२. ऐन वेळेची घाई गर्दी टाळण्यासाठी उमेदवारांना असा सल्ला देण्यात येतो की, त्यांनी त्यांचे अर्ज आगाऊ वेळेत सादर करावेत. संकेतस्थळ हे १०.०४.२०१८ च्या संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत दिवस–रात्र म्हणजेच २४ तास अर्ज स्वीकारेल, त्यानंतर 'लिंक' (जोडणी) खंडित करण्यात येईल.

१३. जे उमेदवार यापूर्वीच शासकीय सेवेत कार्यरत आहेत त्यांनी त्यांच्या विभागाकडून, त्यांच्या विभागास त्यांची उमेदवारी विचारात घेण्याबाबत कोणतीही हरकत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवावे. त्यानंतर, उमेदवाराने सदर प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळेस सादर करावे.

१४. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, ते अनेक जिल्ह्यांतील अनेक पदांसाठी अर्ज करु शकतात. परंतु, भरती परीक्षा सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी व एकाच वेळी घेण्यात येणार असल्याने उमेदवार केवळ एकाच ठिकाणी परीक्षेस बसू शकतो. म्हणूनच, प्रत्येक उमेदवाराने त्याची / तिची शैक्षणिक अर्हता तसेच प्रत्येक आस्थापनेतील जाहिरात केलेल्या पदांची संख्या यांच्या प्रमाणात आपली निवड होण्याची संधी तपासून घ्यावी आणि त्याप्रमाणे कोणत्या आस्थापनांसाठी आणि कोणत्या पदांसाठी त्याचा / तिचा विचार केलेला त्याला / तिला आवडेल त्याचा पसंतीक्रम निश्चित करावा. तो जास्तीत जास्त १० (दहा) पसंती देऊ शकेल. परंतु, एकदा अर्ज सादर केला की, त्यानंतर तो अंतिम राहील, आणि त्यात कोणताही बदल करता येणार नाही.

१५. उमेदवाराने यापुढे याची नोंद घ्यावी की एकच उमेदवार दोनदा अर्ज करु शकणार नाही, आणि प्रत्येक उमेदवाराचा एकच अर्ज असेल. जर एकाच उमेदवाराने अनेक अर्ज भरले तर, फक्त पहिला अर्ज विचारात घेतला जाईल. जर आवश्यक अर्हतेप्रमाणे उमेदवार अर्हताप्राप्त नसेल, तर त्या पदाचा पर्याय त्याच्यासाठी उपलब्ध नसेल.

१६. अपूर्ण अर्ज किंवा असा अर्ज, जो उमेदवाराने सादर केलेल्या तपशीलांमुळे त्यास पदासाठी अपात्र ठरवेल तो संगणक स्वीकारणार नाही.

१७. उमेदवाराने असे नमूद करावे की, त्यास राखीव प्रवर्गाचा म्हणून विचारात घेण्याची इच्छा आहे की त्यास खुल्या प्रवर्गाचा उमेदवार म्हणून विचारात घेण्याची इच्छा आहे. जर उमेदवाराने त्यास राखीव प्रवर्गाचा म्हणून विचारात घेण्याचा पर्याय स्वीकारला आणि जर त्याने त्या प्रवर्गाचा म्हणून त्याचा विचार करण्यासाठी पात्र ठरविणारी प्रमाणपत्रे सादर केली नाहीत तर, त्याने चुकीची माहिती दिली म्हणून त्यास अपात्र ठरविण्यात येईल, आणि त्याचा खुल्या प्रवर्गासाठी विचार करण्यात येणार नाही.

१८. उमेदवाराने अर्ज 'ऑन–लाईन' सादर करण्याच्या टप्प्यावर कोणतीही मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे अथवा त्यांच्या साक्षांकित प्रती पाठवू नयेत.

१९. कोणत्याही जिल्हा न्यायालय अथवा तालुका न्यायालयाचे कार्यालय कोणत्याही अर्जासंदर्भात कोणतीही चौकशी विचारार्थ घेणार नाही. फक्त तांत्रिक स्वरुपाची चौकशी विस्तृत जाहिरातीची लिंक खंडित होईपर्यंत, संगणक विभाग, मुंबई उच्च न्यायालय यांच्या खालील दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत करता येईल. (ई–मेल द्वारे नाही.)

**दूरध्वनी क्रमांक :— १) ०२२ – २२६७६७५१**

**२) ०२२ – २०८२०३५९**

२०. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, उमेदवारांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजून त्यांची पात्रता निर्धारित करण्यात येईल. जर एखाद्या उमेदवाराने दिलेली माहिती ही खोटी, सदोष अथवा चुकीची आहे, असे आढळून आल्यास, अशा उमेदवारास केवळ अनर्ह ठरविण्यात येईल असे नव्हे तर त्यावर खटलासुद्धा भरण्यात येईल. अशा उमेदवारास कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात येईल. तसेच, त्यास उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालयांतील कोणत्याही पदासाठी अर्ज करण्यास मनाई करण्यात येईल.

२१. ऑन–लाईन अर्ज भरल्यानंतर, उमेदवाराने ऑन–लाईन पोचपावती तसेच संपूर्ण अर्जाची 'प्रिंट आऊट' (Printout) प्राप्त करुन घ्यावी. त्यानंतर, जेव्हा पात्र अल्पसूचित उमेदवारांची यादी संकेत स्थळावर प्रदर्शित केली जाईल, तेव्हा उमेदवाराने स्वत: त्याच्या अर्जाची प्रिंट आऊट, त्यावर

योग्य रितीने, पूर्वी पाठविलेले (अपलोड केलेले) छायाचित्र लावून, त्यावर दिलेल्या जागी काळ्या शाईने स्वाक्षरी करुन, संबंधित जिल्हा न्यायालयाकडे, जेथे त्याचे नाव अल्पसूचित केले गेले आहे, सादर करावी आणि एक छायाचित्र सादर करून जिल्हा न्यायालयाकडून आपले प्रवेश पत्र प्राप्त करून घ्यावे आणि सदर न्यायालयाकडे त्याची स्वत:ची ओळख पटविणारे (कोणतेही एक) कागदपत्र जसे की आधारकार्ड, ओळखपत्र, पारपत्र, वाहनचालक परवाना, मतदार ओळखपत्र, पॅनकार्ड, छायाचित्र असलेले ओळखपत्र इ. त्यांच्या मालकाने अथवा शैक्षणिक संस्थेने प्रदान केलेले सादर करुन सदर न्यायालयाकडून पोचपावती प्राप्त करुन घ्यावी.

**२२.** उमेदवारांची उच्च शैक्षणिक अर्हता आणि शैक्षणिक श्रेष्ठत्व यावर आधारित त्यांची अल्पसूची (shortlisting) तयार करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाने राखून ठेवला आहे.

**२३.** प्रवेश पत्र तयार करण्यासाठी उमेदवारांनी त्यांच्या अर्जाची प्रिंट आऊट सादर करताना एक छायाचित्र सादर करावे, याची नोंद घ्यावी.

**२४.** लघुलेखक (नि.श्रे.) या पदांकरिता चाळणी परीक्षा घेण्यात येणार नाही. लिपिक आणि शिपाई/हमाली पदांकरिता ज्या उमेदवारांची नावे शॉर्ट लिस्ट करण्यात आली आहेत अशा उमेदवारांना चाळणी परीक्षा द्यावी लागेल. चाळणी परीक्षेनंतर जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या पदांच्या संख्येच्या सात पट संख्येएवढ्या उमेदवारांना पुढील चाचण्यांकरिता जसे, लिपिक पदांसाठी टंकलेखन आणि शिपाई/हमाल पदांसाठी स्वच्छता आणि क्रियाशीलता या चाचण्यांकरिता बोलाविण्यात येईल. जर तेथे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील ज्यांनी चाळणीपरीक्षेमध्ये सेवा भरती समिती यांचेकडून निश्चित केल्या जाणाऱ्या 'कट ऑफ' गुणांएवढे गुण मिळविले असतील तर, १:७ हे प्रमाण राखले जावे, याकरिता अशा सर्व उमेदवारांना, (जसे) कनिष्ठ लिपिक पदाकरिता टंकलेखन चाचणीकरिता आणि शिपाई/हमाल पदाकरिता स्वच्छता आणि क्रियाशीलता चाचणीकरीता उपस्थित राहण्यासाठी बोलाविण्यात येईल. अशा चाचणी परीक्षेमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे नमूद केलेल्या पदांच्या संख्येच्या तीन पट संख्येएवढ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी उपस्थित राहण्यास सांगण्यात येईल. अशी तयार करण्यात आलेली यादी मुलाखतीच्या वेळापत्रकासहित जिल्हा न्यायालयांच्या कार्यालयांत प्रदर्शित करण्यात येईल.

**२५.** लिपिक पदांसाठीची चाळणी परीक्षा ४० गुणांची बहूपर्यायी, वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या स्थानिक भाषेतील २० प्रश्नांचा समावेश असलेली अशी असेल. तसेच शिपाई/हमाल या पदासाठीची चाळणी परीक्षा ३० गुणांची, १५ बहूपर्यायी, वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नांची, सामान्य ज्ञानाच्या चाचणीसाठी ज्यामध्ये इतिहास, नागरिकशास्त्र, विज्ञान, भूगोल, क्रीडा,

साहित्य आणि चालू घडामोडींवरील ज्ञान यांचा समावेश असलेली अशी असेल. लिपिकांच्या चाळणी परीक्षेत संगणकीय ज्ञानावर आधारित प्रश्नांचा देखील समावेश असेल.

## परीक्षा

**२६.** परीक्षेसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना सूचना

१) तूमचे नांव किंवा कोणताही शब्द किंवा इतर कोणतेही चिन्ह उत्तरपत्रिकेच्या कोणत्याही भागावर लिहू नये. अन्यथा तूमच्या उत्तरांचे मूल्यमापन केले जाणार नाही.

२) ओळखपत्रात (प्रवेशपत्रात) नमूद केलेला नोंदणी क्रमांक उत्तरपत्रिकेच्या पहिल्या पानावर नोंदणी क्रमांकासाठी दिलेल्या रकान्यात अचूक नोंदणी क्रमांक लिहा.

३) अचूक उत्तराची चौकट काळ्या रंगाच्या स्केचपेनने पूर्णपणे आणि काळजीपूर्वक रंगवा आणि (X) किंवा बरोबरची (✓) खूण चौकटीत करु नका.

४) उमेदवारांना परीक्षादालनात भ्रमणध्वनी किंवा इतर इलेक्ट्रॉनिक साहित्य आणण्याची मुभा देण्यात येणार नाही.

५) उमेदवारांनी स्वत:ची लेखनसामग्री विशेषत: काळ्या रंगाचे स्केच पेन सोबत आणावे.

**२७. लघुलेखक (नि.श्रे.) (Stenographers) :—**

लघुलेखक पदासाठी उमेदवाराला प्रत्येकी २० गुणांची इंग्रजी व स्थानिक भाषेतील लघुलेखनाची वेगचाचणी परीक्षा द्यावी लागेल. या परीक्षेचा तपशील खालीलप्रमाणे :—

| अनु. क्र. | भाषा | श्रृतलेखनाचा कालावधी (Duration of Dictation) | श्रृतलेखनाचा वेग (Speed of Dictation) | एकूण शब्द | प्रतिलेखनाचा अवधी (Transcription time) |
|---|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | ६ मिनिटे | १०० श.प्र.मि. | ६०० | ४० मि. |
| २) | स्थानिक | ८ मिनिटे | ८० श.प्र.मि. | ६४० | ४५ मि. |

**२८.** लघुलेखन चाचणीमध्ये कट ऑफ (cut off) गुण मिळविल्यानंतर उमेदवाराला खालील 'कनिष्ठ लिपिक' या शीर्षकाखालील नमूद केलेल्या केलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे जिल्हा सेवा प्रवेश समितीने आदेशित केल्यानुसार प्रत्येकी २० गुणांची स्थानिक व इंग्रजी भाषेतील टंकलेखनाची संगणकावर चाचणी परीक्षा तसेच २० गुणांची मुलाखत द्यावी लागेल.

**२९.** कनिष्ठ लिपिक (Junior Clerks)

स्थानिक भाषेतील २० गुणांच्या टंकलेखन परीक्षेत उमेदवाराला संगणकावर १० मिनिटांत ३०० शब्द टंकलिखित करावे लागतील (३० श.प्र.मि.). उमेदवारांनी केलेल्या टंकलेखनाचे मूल्यमापन जिल्हा न्यायालयातील लघुलेखकांच्या मदतीने करुन घेतले जाईल.

**३०.** ज्या उमेदवारांना स्थानिक भाषेतील टंकलेखन चाचणीमध्ये सेवाप्रवेश समितीने ठरविल्याप्रमाणे कट ऑफ (cut off) गुण मिळतील असे उमेदवार, इंग्रजी टंकलेखन चाचणी परीक्षा देण्यास पात्र ठरतील.

**३१.** जर टंकलेखन चाचणी परीक्षा जिल्हा न्यायालयाच्या इमारतीच्या आवाराबाहेर आयोजित करण्यात आली असेल तर, अशा पात्र उमेदवारांची यादी जिल्हा न्यायालयाच्या कार्यालयात व परीक्षा केंद्रावर लावली जाईल.

**३२.** २० गुणांच्या इंग्रजी टंकलेखन चाचणीत उमेदवाराला संगणकावर १० मिनिटांत ४०० शब्द टंकलिखित करावे लागतील (४० श.प्र.मि.). उमेदवारांनी केलेले टंकलेखन जिल्हा न्यायालयातील लघुलेखकांच्या मदतीने तपासून घेतले जाईल.

**३३.** इंग्रजी आणि स्थानिक भाषेतील टंकलेखन चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करतांना ५ चुकांसाठी १ गुण कापण्यात येईल. तसेच मजकूर वगळणे ही देखील चूक धरली जाईल.

**३४.** ज्या उमेदवारांना इंग्रजी टंकलेखनात सेवाप्रवेश समितीने निश्चित केल्याप्रमाणे कट ऑफ (cut off) गुण मिळतील त्यांना इंग्रजी टंकलेखन परीक्षेनंतर होणाऱ्या मौखिक परीक्षेसाठी पात्र समजले जाईल. जाहिरात दिलेल्या पदसंख्येपेक्षा तिप्पट उमेदवारांना, त्यांना इंग्रजी टंकलेखन, स्थानिक भाषेतील टंकलेखन आणि चाळणीपरीक्षेत (screening test) मिळालेल्या गुणांच्या आधारावर मौखिक परीक्षेसाठी बोलावले जाईल. जर १:३ हे प्रमाण राखण्यासाठी शॉर्टलिस्ट (Short-list) केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मौखिक परीक्षेसाठी बोलाविले जाईल.

**३५.** शिपाई (Peon) /हमाल :— क्रियाशीलता चाचणी व स्वच्छता चाचणी :— शिपाई पदासाठी ५ गुणांची क्रियाशीलता चाचणी जाहिरातीत प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या तारखेस घेतली जाईल. या चाचणीमध्ये उमेदवारांच्या हालचालीतील चपळाई व तत्परता तपासली जाईल.

**३६.** ज्या दिवशी क्रियाशीलता चाचणी घेतली जाईल त्याच दिवशी शिपाई पदासाठी ५ गुणांची न्यायालय इमारत व न्यायालय आवाराच्या स्वच्छतेची चाचणी सुद्धा घेतली जाईल. न्यायालय इमारत आणि आवाराच्या स्वच्छतेमधील उमेदवाराचे कौशल्य व चपळाई, उमेवारांकडून प्रत्यक्ष काम करुन घेऊन तपासले जाईल. चाळणी परीक्षा, क्रियाशीलता व स्वच्छता परीक्षा यांतील उमेदवारांचे काम यावर आधारित पात्र उमेवारांची मुलाखतीसाठी

यादी, मुलाखतीच्या वेळापत्रकासह, जिल्हा न्यायालयाच्या सूचनाफलकावर त्याच दिवशी लावली जाईल. अशा उमेदवारांची संख्या जाहिरात दिलेल्या पदसंख्येच्या तिपटीपेक्षा जास्त नसेल. जर १:३ हे प्रमाण राखण्यासाठी शॉर्ट–लिस्ट (shortlist) केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल.

## मुलाखत

**३७.** ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाण्याची शक्यता आहे त्यांनी मुलाखतीच्या वेळेस खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती आणि त्यांचे मूळ प्रमाणपत्र आपापल्या जिल्हा न्यायालयाच्या प्रबंधकांकडे सादर केले पाहिजेत.

i) जन्मतारखेचा दाखला किंवा पूरावा (शाळा सोडल्याचा/जन्माचा/ S.S.C. दाखला)

ii) अर्हता परीक्षा / पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतचा दाखला.

iii) अर्हता परीक्षेत / पदवी परीक्षेत मिळालेल्या गुणांचे विवरणपत्र.

iv) दोन सन्माननीय व्यक्ती, ज्यांची नावे मूळ अर्जात नमूद केलेली आहेत, त्यांनी दिलेला, त्याचे / तिचे चारित्र्य चांगले असल्याबद्दलचा चारित्र्याचा दाखला.

v) अर्हतेच्या रकान्यात नमूद केल्याप्रमाणे, संगणक प्रचालनाचे विहित ज्ञान असल्याबाबतचा विद्यापीठ/संस्थेने दिलेला दाखला.

vi) इंग्रजी आणि मराठी लघुलेखन व टंकलेखनातील आवश्यक वेग असल्याबाबतचा शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र शासन किंवा शासकीय मंडळ किंवा I.T.I. यांनी दिलेला दाखला.

vii) संबंधित जिल्हा सरकारी रुग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला, लागू असल्यास.

viii) शासन विहित करेल त्या प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला, जेथे लागू असेल तेथे.

ix) छोट्या लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र {नमूना ''अ'' (मूळ)}, जे जाहिरातीच्या शेवटी उपलब्ध आहे.

x) विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र, जर उमेदवार यापूर्वीच शासकीय सेवेत कार्यरत असेल तर.

**३८.** जाहिरातीत प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून, लघुलेखक (निम्न श्रेणी) व कनिष्ठ लिपिक पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रत्येकी २० गुणांची व शिपाई पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची १० गुणांची मौखिक परीक्षा खालील क्रमाने, सेवा प्रवेश समितीमधील सदस्यांकरवी रोजच्या रोज घेतली जाईल—

१) लघुलेखक, २) कनिष्ठ लिपिक, ३) शिपाई

सदर समिती प्रत्येक पदासाठी अंतिम निवड / प्रतिक्षायादी तयार करील ज्यात उमेदवारांनी प्रत्येक चाचणी परीक्षेत मिळविलेल्या गुणांचा उल्लेख असेल.

**३९.** समितीने असे ठरविले आहे की जेथे निवड करण्यासाठी निम्नतम पात्रता गुण (bench mark) निश्चित करण्यात आले नसतील तेथे असे निम्नतम पात्रता गुण ३५% असावेत आणि अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी हे गुण ५% नी शिथील करावेत.

**४०.** निवड/प्रतिक्षा सूची सर्व सेवाप्रवेश समिती सदस्यांच्या सहीनिशी तयार केली जाईल आणि अशी सूची, विहित नमून्यातील आवश्यक माहिती, सेवाप्रवेश समितीच्या सर्व सदस्यांच्या सहीचे कार्यवृत्त आणि आरक्षण धोरणाचे तत्वत: पालन केले आहे अगर कसे या संबंधीच्या निवेदनासोबत उच्च न्यायालयाच्या मान्यतेसाठी सादर केली जाईल. निवड / प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची संख्या ही जाहिरात दिलेल्या पदांपेक्षा जास्त नसेल. उच्च न्यायालयाच्या मान्यतेनंतरच निवड/प्रतिक्षा सूची, संबंधित जिल्हा न्यायालयांच्या सूचना फलकांवर दर्शविली जाईल आणि उच्च न्यायालयाच्या उपरोल्लिखित अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

**४१.** उमेदवारांना चाचणी परीक्षांसाठी निश्चित केलेल्या तारखांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**४२.** सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात या कार्यालयाचे नियंत्रण नसलेल्या कोणत्याही अकल्पित घटनांच्या घडण्यासापेक्ष बदल होऊ शकतो. असा बदल वेळोवेळी कार्यालयाच्या सूचनाफलकावर अधिसूचित करण्यात येईल आणि उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**४३.** जर एखाद्या उमेदवाराने निवड प्रक्रिये संदर्भात स्वत: अथवा इतर कोणाही मार्फत निवड समितीचे सदस्य, जिल्हा न्यायालयातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास सदर उमेदवारास अनर्ह ठरविण्यात येईल. याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

४४. निवड / नियुक्त्या ह्या कोटेकोरपणाने उमेदवारांना सर्व परीक्षा आणि मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे तयार करण्यात येणाऱ्या गुणवत्ताक्रमानुसार करण्यात येतील.

४५. अर्जाचा विहित नमुना उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर – https://bhc.gov.in/bhcrecruitment/ येथे उपलब्ध आहे.

४६. निवड सूची / प्रतिक्षा यादी ही, उच्च न्यायालय विहित करील अशा कालावधीसाठी वैध राहील.

४७. मुंबई उच्च न्यायालयाने या भरतीसाठी कोणतेही शुल्क आकारलेले नाही. ही पूर्णपणे विनाशुल्क आहे. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की अर्ज दाखल करतेवेळी ते कोणत्याही प्रकारच्या शुल्कापोटी कोणतेही दर्शनी धनाकर्ष (Demand Draft), प्रदानादेश (Pay Order), धनादेश (Cheque) इ. पाठविणार नाहीत.

४८. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की शहर दिवाणी आणि सत्र न्यायालय, मुंबई व लघुवाद न्यायालय, मुंबई यांच्या आस्थापनेवर, चतुर्थश्रेणी प्रवर्गात 'शिपाई' पद नसून 'हमाल' हे पद आहे, तर इतर सर्व आस्थापनांवर चतुर्थश्रेणी प्रवर्गात 'हमाल' हे पद नसून 'शिपाई' हे पद आहे. त्यामुळे 'ऑन–लाईन' अर्ज भरताना उमेदवारांनी ही गोष्ट लक्षात घ्यावी. जर उमेदवाराने शिपाई / हमाल पदासाठी अर्ज करताना शहर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई किंवा लघुवाद न्यायालय, मुंबई असा विकल्प दिला असेल तर, त्याचा / तिचा अर्ज 'शिपाई' पदासाठी न समजता 'हमाल' या पदासाठी असल्याचे समजण्यात येईल. इतर सर्व आस्थापनांसाठी जर अर्जदाराने 'शिपाई / हमाल' या पदासाठी अर्ज केला असेल तर त्याचा / तिचा अर्ज 'शिपाई' पदासाठी असल्याचे समजण्यात येईल.

४९. 'शिपाई / हमाल' पदासाठी इ. ७वी मधील गुण नमूदकरणे अनिवार्य असेल. 'शिपाई / हमाल' पदासाठी जर उमेदवार इ. ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण असेल आणि पुढील उच्च अर्हता प्राप्त उदा. १०वी किंवा १२वी असेल व त्याच्याकडे / तिच्याकडे इ. ७वी चे गुणपत्रक नसेल तर, त्याने / तिने 'ऑन–लाईन' अर्ज भरताना इ. ७वी करिता काल्पनिकरित्या ५०% गुणांची (उदा. एकूण १०० पैकी ५० गुण प्राप्त) नोंद करावी जेणेकरुन त्याचा / तिचा अर्ज संगणकाकडून स्विकृत केला जाईल.

५०. उमेदवाराने पद आणि जिल्ह्याकरिता नमूद केलेला प्राधान्यक्रम त्याच्यावर / तिच्यावर बंधनकारक असेल आणि जर उमेदवाराने दिलेल्या त्याच्या / तिच्या पहिल्या पसंतीच्या पदासाठी त्याचे / तिचे नाव 'शॉर्ट–लिस्ट' करण्यात आल्यास त्याने / तिने दिलेल्या इतर

विकल्पांचा विचार करण्यात येणार नाही आणि सदर उमेदवारास संबंधित पदाच्या भरती प्रक्रियेकरिता संबंधित जिल्ह्यामध्येच उपस्थित रहावे लागेल. त्याचप्रमाणे जर त्याचे / तिचे नाव दुसऱ्या किंवा पुढील क्रमानुरुप पसंतीच्या पदासाठी 'शॉर्ट–लिस्ट' करण्यात आले, तर इतर विकल्पांचा विचार करण्यात येणार नाही. उदा. एखाद्या उमेदवाराने पहिली पसंती शिपाई / हमाल पदाकरिता आणि दुसरी पसंती कनिष्ठ लिपिक अथवा लघुलेखक (नि.श्रे.) पदाकरिता दिली असेल आणि जर त्याचे नाव पहिल्या पसंतीच्या शिपाई / हमाल पदाकरिता 'शॉर्ट–लिस्ट' झाले तर त्याचा कनिष्ठ लिपिक अथवा लघुलेखक (नि.श्रे.) पदाकरिता दिलेला पसंतीक्रम विचारात घेतला जाणार नाही.

**५१.** 'लिपिक किंवा लघुलेखक (नि.श्रे.)' पदासाठी इ. १०वी चे गुण नमूद करणे अनिवार्य आहे.

**५२.** जोपर्यंत उमेदवार, त्याने अर्ज केलेल्या पदासाठी आवश्यक असलेल्या कमीतकमी अर्हतेच्या गुणांचा तपशील नमूद करीत नाही तोपर्यंत त्या पदांचे विकल्प 'ऑन–लाईन' अर्जाच्या 'पोस्ट ड्रॉप बॉक्स' मध्ये दिसणार नाहीत. उदा. :–

* शिपाई / हमाल पदाकरिता कमीतकमी अर्हता इ. ७वी आहे आणि सदर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने त्यातील गुण नमूद करणे अनिवार्य आहे.
* कनिष्ठ लिपिक आणि लघुलेखक (नि.श्रे.) पदाकरिता कमीतकमी अर्हता इ. १०वी आहे आणि इतर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने त्यातील गुण नमूद करणे अनिवार्य आहे.

**५३.** शैक्षणिक माहितीच्या (Educational Information) रकान्यात उमेदवाराने त्याच्याकडे असलेल्या सगळ्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील नमूद करणे अनिवार्य आहे. उदा. जर उमेदवाराकडे एम.कॉम.(M.Com.) पदवी असेल तर 'शिपाई / हमाल' पदाकरिता त्याने इ. ७वी, इ. १०वी एस.एस.सी. (S.S.C.), एच.एस.सी. (H.S.C.), बी.कॉम. (B.Com.) आणि नंतर एम.कॉम.(M.Com.)चा तपशील नमूद करणे आवश्यक आहे आणि कनिष्ठ लिपिक किंवा लघुलेखक पदाकरिता त्याने इ. १०वी एस.एस.सी. (S.S.C.), एच.एस.सी. (H.S.C.), बी.कॉम. (B.Com.) आणि नंतर एम.कॉम.(M.Com.)चा तपशील नमूद करणे आवश्यक आहे.

**५४.** ऑन–लाईन अर्ज भरल्यानंतर म्हणजेच पदांचा आणि न्यायालयाच्या ठिकाणांचा पसंतीक्रम दिल्यानंतर उमेदवाराने 'आय अग्री' (I Agree) या चेक बॉक्सचे बटण दाबून केलेले प्रतिज्ञापन मान्य करावे आणि त्यानंतर ''Submit Application'' हे बटण दाबून अर्ज सादर करावा. त्यानंतर अर्जाच्या नमुन्यात कोणतेही बदल करता येणार नाहीत.

***********

**प्रतिज्ञापत्र** (नमुआ–अे)

मी, श्री./श्रीमती/कुमारी ______________________________

श्री. ______________________________ यांचा/यांची मुलगा/मुलगी वय ___ वर्षे,

राहणार ______________________________ याद्वारे

पुढीलप्रमाणे जाहीर करतो / करते की,

१) मी ______________________ या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२) आज रोजी मला _______ (संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या _____ आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८ मार्च, २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

**स्थळ :**

**दिनांक :** **(उमेदवाराची स्वाक्षरी)**